प्रसिद्धी विभाग

शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

**रोजगार मेळावा कार्यक्रम**



सकाळ गुरुवार, १० जानेवारी २०१९ २

# राजगुरू महाविद्यालयात येत्या शनिवारी मेगाभरती

## विद्यार्थ्यांना लगेचच मिळणार नियुक्तिपत्र

राजगुरुनगर, ता. ९ : भारत सरकारचे ऑटोमोटिव्ह स्कील डेव्हलपमेंट महामंडळ व खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या वतीने १२ जानेवारी रोजी महाराष्ट्रातील बीकॉम, एमकॉम आणि ऑटोमोबाईल पदवीधारक विद्यार्थ्यांसाठी विविध कंपन्यांच्या वतीने महाविद्यालयात मेगाभरती मेळावा आयोजित करण्यात आल्याची माहिती संस्थाध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी दिली.

या वेळी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर उपस्थित होते. या मेगाभरतीत वाहननिर्मिती क्षेत्रातील १० कंपन्या सहभागी होणार आहेत. त्यामध्ये वाहननिर्मिती करणाऱ्या कंपन्या, डीलर्स, लहान मोठे व्यावसायिक, स्कील कौन्सिलशी संलग्न कंपन्या सहभागी होणार आहेत. भारतात या क्षेत्रात मोठे मनुष्यबळ लागणार असल्यामुळे भारत सरकारच्या ऑटोमोटिव्ह स्कील डेव्हलपमेंट महामंडळाच्या वतीने अशाप्रकारच्या भरतीचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी ९ ते ५ या वेळात ही भरती होणार असून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना लगेचच कंपन्यांकडून नियुक्तीपत्र मिळणार आहे. या सुवर्णसंधीचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी केले आहे.

पुणे, बुधवार, ९ जानेवारी २०१९ पुणे जिल्हा पुढारी

## मेगाभरतीचे शनिवारी आयोजन

राजगुरुनगर : बी. कॉम, एम. कॉम आणि ऑटोमोबाइल पदवीधारक विद्यार्थ्यांसाठी विविध कंपन्यांच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मेगा नोकरभरती मेळाव्याचे आयोजन केले आहे. हा मेळावा शनिवारी (दि. १२) होणार असल्याचे संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी सांगितले. या प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, हरिभाऊशेठ सांडभोर उपस्थित होते. भारत सरकारचे ॲटोमोटिव्ह स्कील डेव्हलपमेंट महामंडळ व खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या वतीने याचे आयोजन केले आहे. या मेगा नोकरभरती मेळाव्यात वाहन निर्मिती क्षेत्रातील १० कंपन्यासह लहान-मोठे व्यावसायिक, स्कील कौन्सिलशी संलग्न कंपन्या सहभागी होणार आहेत. मेगा भरतीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना कंपन्यांकडून लागलीच नियुक्तीपत्र देण्यात येणार आहे. या संधीचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी केले.

प्रभात बुधवार, दि. ९ जानेवारी २०१९

## हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात शनिवारी मेगाभरती

राजगुरुनगर, दि. ८ (प्रतिनिधी) - भारत सरकारचे ॲटोमोटीव्ह स्कील डेव्हलपमेंट महामंडळ व खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या वतीने शनिवारी (दि. १२) महाराष्ट्रातील बी. कॉम, एम. कॉम तसेच ॲटोमोबाईल पदवीधारक विद्यार्थ्यांसाठी विविध कंपन्यांच्या वतीने महाविद्यालयात मेगाभरती आयोजित करण्यात आल्याची माहिती संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी दिली. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर उपस्थित होते. या मेगाभरतीत वाहन निर्मिती क्षेत्रातील १० कंपन्या सहभागी होणार आहेत. त्यामध्ये वाहन निर्मिती करणाऱ्या कंपन्या, डीलर्स, लहान मोठे व्यावसायिक स्कील कौन्सिलशी सलग्न कंपन्या सहभागी होणार आहेत. भारतात या क्षेत्रात मोठे मनुष्यबळ लागणार असल्यामुळे भारत सरकारच्या ॲटोमोटीव्ह स्कील डेव्हलपमेंट महामंडळाच्या वतीने अशा प्रकारच्या भरतीचे आयोजन सकाळी ९ ते ५.३० या वेळात करण्यात आले असून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना लगेचच कंपन्यांकडून नियुक्तीपत्र मिळणार आहे.

लोकमत पुणे, गुरुवार, दि. १० जानेवारी २०१९

# राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळातर्फे मेगा भरती

खेड : भारत सरकारच्या ॲटोमोटिव्ह स्किल डेव्हलपमेंट महामंडळ व हुतात्मा राजगुरु महाविद्यालय यांच्या वतीने शनिवारी (१२ जानेवारी) महाराष्ट्रातील बी.कॉम, एम.कॉम; तसेच ॲटोमोबाईल पदवीधारक विद्यार्थ्यांसाठी विविध कंपन्यांच्या वतीने महाविद्यालयात मेगा भरती आयोजित करण्यात आली आहे.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी मेगा भरतीबद्दल माहिती दिली. मेगा भरतीत वाहननिर्मिती क्षेत्रातील १० कंपन्या सहभागी होणार आहेत. त्यामध्ये वाहननिर्मिती करणाऱ्या कंपन्या, डीलर्स, लहान-मोठे व्यावसायिक, स्किल कौन्सिलशी सलग्न कंपन्या सहभागी होणार आहेत. भारतात या क्षेत्रात मोठे मनुष्यबळ लागणार असल्यामुळे भारत सरकारच्या ॲटोमोटिव्ह स्किल डेव्हलपमेंट महामंडळाच्या वतीने अशा प्रकारच्या भरतीचे आयोजन सकाळी ९ ते साडेपाच या वेळात करण्यात आले असून, निवड झालेल्या विद्यार्थ्यांना लगेचच कंपन्यांकडून नियुक्तिपत्र मिळणार आहे.

केसरी पुणे, ११ जानेवारी २०१९

# राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाच्या वतीने उद्या राजगुरू महाविद्यालयात मेगाभरती

**राजगुरूनगर, (वार्ताहर) :** भारत सरकारचे ॲटोमोटीव्ह स्कील डेव्हलपमेंट महामंडळ व खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या वतीने १२ जानेवारी (शनिवार) रोजी महाराष्ट्रातील बी.कॉम, एम.कॉम तसेच ॲटोमोबाईल पदवीधारक विद्यार्थ्यांसाठी विविध कंपन्यांच्या वतीने राजगुरु महाविद्यालयात मेगाभरती आयोजित करण्यात आल्याची माहिती संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी दिली. या प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर उपस्थित होते.

या मेगाभरतीत वाहन निर्मिती क्षेत्रातील दहा कंपन्या सहभागी होणार आहेत. त्यामध्ये वाहन निर्मिती करणाऱ्या कंपन्या, डीलर्स, लहान मोठे व्यावसायिक, स्कील कौन्सिलशी संलग्न कंपन्या सहभागी होणार आहेत. भारतात या क्षेत्रात मोठे मनुष्यबळ लागणार असल्यामुळे भारत सरकारच्या ॲटोमोटीव्ह स्कील डेव्हलपमेंट महामंडळाच्या वतीने अशा प्रकारच्या भरतीचे आयोजन सकाळी नऊ ते सायंकाळी साडेपाच या वेळात करण्यात आले असून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना लगेचच कंपन्यांकडून नियुक्तीपत्र मिळणार आहे. तेव्हा या सुवर्ण संधीचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी केले आहे.

## तायक्वांदो स्पर्धेत यश

**मंचर, (प्रतिनिधी) :** आंबेगाव तालुक्यातील मंचर येथील महात्मा गांधी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेत सुवर्णपदक पटकविले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक आणि ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. राष्ट्रीय तायक्वांदो फेडरेशन ऑफ इंडिया अंतर्गत तिसऱ्या राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धा येरवडा पुणे या ठिकाणी नुकत्याच पार पडल्या.

प्रभात पुणे, बुधवार, दि. १६ जानेवारी २०१९

# मेगाभरतीत ९६ जणांना नोकरी

## हुतात्मा राजगुरुनगर महाविद्यालयाचा उपक्रम : नऊ कंपन्यांचा सहभाग

**३४० उमेदवारांनी केली होती नोंदणी**



राजगुरुनगर : येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील मेघा भरतीसाठी आलेले उमेदवार.

**राजगुरुनगर, दि. १५ (प्रतिनिधी)** - भारत सरकारचे ॲटोमोटोव्ह स्कील डेव्हलपमेंट महामंडळ व खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे हुतात्मा राजगुरु महाविद्यालय यांच्यावतीने शनिवारी (दि. १२) बी. कॉम., एम. कॉम. तसेच ॲटोमोबाईल पदवीधारक विद्यार्थ्यांसाठी आयोजित मेघाभरतीत ९६ बेरोजगार युवकांना प्रत्यक्ष नेमणुकीचे पत्र देण्यात आले. या मेगाभरतीसाठी ३४० उमेदवारांनी नोकरीसाठी नोंदणी केली होती.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात मेघाभरतीचे उद्‌घाटन संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, दिल्लीच्या राष्ट्रीय कौशल्य विकास विभागाच्या समन्वयक प्रियंका गुप्ता, माजी जिल्हा परिषद सदस्य अनिल राक्षे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. जी. बी. गायकवाड उपस्थित होते.

नानासाहेब टाकळकर यांनी उच्च शिक्षित बेरोजगारांना नोकरीची संधी उपलब्ध होण्यासाठी राष्ट्रीय कौशल्य विकास विभागाने मेगाभरतीचे उपक्रम सातत्याने राबविण्याची गरज व्यक्त केली. यासाठी मेगाभरतीच्या आयोजनासाठी संस्थेच्या वतीने सर्वोतोपरी सहकार्य करण्यात येईल असे सांगितले. प्रियंका गुप्ता यांनी सांगितले की, भविष्यात वाहन क्षेत्रात मोठे मनुष्यबळ लागणार असल्यामुळे भारत सरकारच्या ॲटोमोटीव्ह स्कील डेव्हलपमेंट महामंडळाच्या वतीने अशा असे अनेक मेळावे आयोजित करण्यात येणार आहेत. या मेगाभरतीत नेकलेस सोल्युशन प्रा.लि., टीव्हीएस ॲन्ड सन्स प्रा.लि., कोठारी व्हिल्स, टाटा मोटर्स, मारूती सुजुकी ॲन्ड एमटीआय, वासना मोटर्स, जेबीएम प्रा.लि. अशा ९ कंपन्या सहभागी झाल्या. त्यांनी नोंदणी केलेल्या सर्व उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस.बी.पाटील, सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळूक तर प्लेसमेंट समिती प्रमुख प्रा. व्ही. बी. देशमुख यांनी आभार मानले.

४ पुढारी
१४ जानेवारी २०१९

# राजगुरू महाविद्यालयातील मेगाभरतीत ९६ जणांना नोकरी

**राजगुरूनगर : प्रतिनिधी**

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित मेगाभरतीत ३४० उमेदवारांनी नोंदणी केली, त्यातील ९६ युवकांना प्रत्यक्ष नेमणुकीचे पत्र देण्यात आले.

ऑटोमोटिव्ह स्कील डेव्हलपमेंट महामंडळ व खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या वतीने शनिवारी (दि. १२) बी. कॉम, एम. कॉम तसेच ऑटोमोबाईल पदवीधारक विद्यार्थ्यांसाठी या मेघाभरतीचे आयोजन केले होते. याचे उदघाटन संस्थेचे उपाध्यक्ष प्रतापराव टाकळकर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, दिल्लीच्या राष्ट्रीय कौशल्य विकास विभागाच्या समन्वयक प्रियंका गुप्ता, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. जी. जी. गायकवाड उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, तर सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी केले. प्लेसमेंट समिती प्रमुख प्रा. व्ही. बी. देशमुख यांनी आभार मानले.

लोकमत पुणे, मंगळवार, दि. १५ जानेवारी २०१९ | ३

# राजगुरु महाविद्यालयातील मेगाभरतीत ९६ बेरोजगारांना नोकरी

लोकमत न्यूज नेटवर्क

खेड : भारत सरकारच्या ऑटोमोटिव्ह स्किल डेव्हलपमेंट, हुतात्मा राजगुरु महाविद्यालय यांच्या वतीने (दि. १२) बी.कॉम., एम.कॉम. तसेच ऑटोमोबाईल पदवीधारक विद्यार्थ्यांसाठी आयोजित मेगाभरतीत ९६ बेरोजगार युवकांना प्रत्यक्ष नेमणुकीचे पत्र देण्यात आले.

या मेगाभरतीसाठी ३४० उमेदवारांनी नोकरीसाठी नोंदणी केली होती. मेगाभरतीचे उद्घाटन संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, दिल्लीच्या राष्ट्रीय कौशल्य विकास विभागाच्या समन्वयक प्रियंका गुप्ता, माजी जि.प. सदस्य अनिल राक्षे, प्राचार्य डॉ.एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ.एच.एम. जरे, डॉ.व्ही.डी. कुलकर्णी, डॉ.संजय शिंदे, प्रा.जी.जी. गायकवाड उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी उच्चशिक्षित बेरोजगारांना नोकरीची संधी उपलब्ध होण्यासाठी राष्ट्रीय कौशल्य विकास विभागाने मेगाभरतीचे उपक्रम सातत्याने राबविण्याची गरज व्यक्त केली.

राष्ट्रीय कौशल्य विकास विभागाच्या समन्वयक प्रियंका गुप्ता यांनी भविष्यात वाहन क्षेत्रात मोठे मनुष्यबळ लागणार असल्यामुळे भारत सरकारच्या ऑटोमोटिव्ह स्कील डेव्हलपमेंट महामंडळाच्या वतीने असे अनेक मेळावे आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगितले.

या मेगाभरतीत नेकलेस सोल्युशन प्रा.लि., टीव्हीएस अँन्ड सन्स प्रा.लि., कोठारी व्हिल्स, टाटा मोटर्स, मारुती सुझुकी अँन्ड एमटीआय, बाफना मोटर्स, जेबीएम प्रा.लि. अशा ९ कंपन्या सहभागी झाल्या.

सकाळ पुणे, मंगळवार, १५ जानेवारी २०१९ २

# मेगाभरतीत ९६ जणांना नोकरी

## राजगुरुनगरला राष्ट्रीय कौशल्य विकास विभागाचा उपक्रम

**राजगुरुनगर, ता. १४ : भारत सरकारचे ऑटोमोटिव्ह स्कील डेव्हलपमेंट महामंडळ व येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्यावतीने बी.कॉम., एम.कॉम. आणि ऑटोमोबाइल पदवीधारक विद्यार्थ्यांसाठी शनिवारी आयोजित करण्यात आलेल्या मेगाभरतीत ९६ बेरोजगार युवकांना प्रत्यक्ष नेमणुकीचे पत्र देण्यात आले. या मेगाभरतीस ३४० उमेदवारांनी नोकरीसाठी नोंदणी केली होती.**



राजगुरुनगर (ता. खेड) : विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या मेगाभरतीचे उद्‌घाटन करताना मान्यवर.

या मेगाभरतीचे उद्‌घाटन संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी संस्था अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, दिल्लीच्या राष्ट्रीय कौशल्य विकास विभागाच्या समन्वयक प्रियांका गुप्ता, माजी जिल्हा परिषद सदस्य अनिल राक्षे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एन. एस. जरे, डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. जी. जी. गायकवाड आदी उपस्थित होते.

या प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर म्हणाले, "तंत्रशिक्षित बेरोजगारांना नोकरीची संधी उपलब्ध होण्यासाठी राष्ट्रीय कौशल्य विकास विभागाने मेगाभरतीचे उपक्रम सातत्याने राबविण्याची गरज आहे." प्रियांका गुप्ता म्हणाल्या, "भविष्यात वाहन क्षेत्रात मोठे मनुष्यबळ लागणार आहे, त्यामुळे भारत सरकारच्या ऑटोमोटिव्ह स्कील डेव्हलपमेंट महामंडळाच्या वतीने असे अनेक मेळावे आयोजित करण्यात येणार आहेत."

या मेगाभरतीत नेक्सलेस सोल्यूशन प्रा.लि., टीव्हीएस ॲंड सन्स प्रा. लि., कोठारी व्हील्स, टाटा मोटर्स, मारुती सुझुकी ॲंड एसटीआय, वासना मोटर्स, बेबीएम प्रा.लि. या ९ कंपन्या सहभागी झाल्या. त्यांनी नोंदणी केलेल्या सर्व उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. प्राचार्य डॉ. पाटील यांनी प्रास्ताविक केले, तर प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी सूत्रसंचालन केले. प्लेसमेंट समितीप्रमुख प्रा. व्ही. बी. देशमुख यांनी आभार मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख